छोटा राजनच्या वाढदिवसानिमित्त केक कापणं बांधकाम व्यावसायिकाला पडलं महागात

मुंबई पोलिसांनी केली कारवाई

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : कुख्यात गुंड छोटा राजनच्या वाढदिवसानिमित्त मालाडमध्ये फलक लावण्याप्रकरणी कुरार पोलिसांनी शनिवारी सहा जणांवर गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, आता राजनच्या वाढदिवसानिमित्त केक कापल्याप्रकरणी मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाला अटक करण्यात आली आहे. श्रीपाद दिनकर पराडकर उर्फ निलेश उर्फ अप्पा असं या व्यावसायिकाचे नाव आहे.

१३ जानेवारी रोजी टिळक नगर येथील सहकार जंक्शनजवळ श्रीपाद दिनकर पराडकर याने छोटा राजनच्या वाढदिवसानिमित्त राजनचा फोटो असलेला केक कापला होता. या घटनेचा व्हिडीओदेखील व्हायरल झाला होता. पोलिसांनी या व्हिडीओ दखल घेत पराडकरला अटक केली आहे. तसेच त्याला न्यायालयत हजर केले असता न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला आहे. याचबरोबर पराडकचे छोटा राजनशी काय संबंध आहेत? याची चौकशीदेखील पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, तत्पूर्वी छोटा राजनच्या वाढदिवसानिमित्त १४ आणि १५ जानेवारीला मालाड पूर्वेकडील कुरार व्हिलेज येथील तानाजी नगरमधील गणेश मैदानात कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी परिसरात फलक लावण्यात आले होते. त्यावर छोटा राजनचा 'आधारस्तंभ' असा उल्लेख करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या होत्या. याप्रकरणी कुरार पोलिसांनी कारवाई करत हे फलक तत्काळ फलक हटवले होते.

नवीन जलजोडणीसाठी लाच स्वीकारली

पालिकेच्या पाणी खात्यातील सहा कामगारांना नोटीस

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : नवीन जलजोडणीचे काम करून दिल्याबद्दल लाच स्वीकारल्याप्रकरणी पाणी पुरवठा विभागातील



सहा कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. कुर्ला येथील एका जलजोडणीधारकाकडून पैसे घेतानाची ध्वनिचित्रफित समाजमाध्यमावर फिरत होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन फिटर व पाच कामगारांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. असल्फा घाटकोपर परिसरात हिमालया सोसायटी मार्गावर असलेल्या गोविंद नगर चाळीत नवीन जलजोडणीसाठी कार्यादेश देण्यात आला होता. जलजोडणीचे काम पूर्ण झाल्यानंतर फिटर असलेल्या व्यक्तीने काम पूर्ण झाल्याचा अभिप्राय जलजोडणी धारकाच्या निकटवर्तीयांकडून घेतला व त्यांच्याकडून त्यांच्याकडून पैसे घेतले. या घटनेची ध्वनिचित्र फित समाज माध्यमांवर टाकण्यात आली होती.

विशेष म्हणजे ही ध्वनिचित्र फित पालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांच्यापर्यंत पोहोचली. त्यांनी ही फित संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पाठवली. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. त्यामुळे कुर्ला एल विभागातील जलकामे खात्यातील साहाय्यक अभियंत्यांनी सहा कामगारांना नोटीस बजावली आहे.

जलजोडणीसाठी लाच घेणे हे महापालिका नियमांच्या विरोधात आहे. याप्रकरणी आपल्यावर निलंबनाची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा तीन दिवसात करावा असे या नोटिशीत म्हटले आहे. खुलाश्यामुळे समाधान न झाल्यास शिस्तभंगाची व प्राथमिक चौकशीची कारवाई करण्यात येईल असा इशारा या नोटिशीत देण्यात आला आहे.

मनसेच्या बालेकिल्ल्याला खिंडार

नाशिकमधील शेकडो कार्यकर्ते ठाकरे गटात प्रवेश करणार

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : नाशिकमधून मोठी बातमी समोर येत आहे. नाशिक शहर हा मनसेचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र त्याच बालेकिल्ल्याला आता ठाकरे गटाकडून खिंडार पाडण्यात आलं आहे. आज नाशिकमधील मनसेचे शेकडो कार्यकर्ते हे ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. हे कार्यकर्ते आज मातोश्रीवर ठाकरे गटात सामील होणार आहेत. आमचे जेवढे कार्यकर्ते गेले त्यापेक्षा आता अधिक कार्यकर्ते आमच्या पक्षात येत असल्याचा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. मात्र दुसरीकडे हा मनसेसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

काही दिवसांपूर्वीच नाशिकमध्ये शिंदे गटाने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला होता. ठाकरे गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यापूर्वी देखील एकदा ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. एकीकडे शिंदे गटाकडून ठाकरे गटाला धक्क्यावर धक्के देणं सुरू आहे. मात्र दुसरीकडे आता ठाकरे गटाकडून मनसेला मोठा धक्का देण्यात आला आहे. मनसेचे शेकडो कार्यकर्ते आज ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. मातोश्रीवर हा जाहीर प्रवेश होणार आहे.

पुढील काही दिवसांत राज्याच्या प्रमुख शहरातील महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये मुंबई, पुण्यासह नाशिकचा देखील समावेश आहे. मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर शेकडो कार्यकर्ते हे ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याने याचा मोठा फटका हा मनसेला बसण्याची शक्यता आहे.

चपलेमुळे ४० तोळे सोन्याची चोरी उघडकीस, बहिणीचे दागिने चोरणारी मावस बहीण गजाआड

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : कार्यक्रमादरम्यान महिलेच्या पर्समधून घराची आणि तिजोरीची चावी चोरली आणि त्या चावीच्या सहाय्याने दोन तासाच्या आत घरात घुसून ४० तोळे सोन्याचे दागिने चोरले. मात्र ही चोरी लपू शकली नाही. कोणताही पुरावा नसताना अथक तपास करत डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी चोरट्या मावस बहीणला तिच्या चप्पलच्या आधारे अटक केली आणि ४० तोळे सोने हस्तगत केले आहे. प्रिया सक्सेना डोंबिवली इथल्या खोनी पलावा परिसरात राहतात. त्या नवी मुंबई इथल्या कामोठे इथे कार्यक्रमात गेल्या होता. त्यावेळी त्यांची मावस बहीण सिमरन पाटील यांनी ही चोरी केली. १२ जानेवारीला प्रिया सक्सेना आपल्या एका नातेवाईकाच्या कार्यक्रमासाठी नवी मुंबई येथील कामोठे परिसरात गेल्या होत्या. त्यांच्या घराला कुलूप होते. कार्यक्रमा दरम्यान त्यांनी आपली पर्स पाहिली असता पर्समधून घराची आणि लॉकरची चावी गायब होती. त्या घरी आल्या असता त्यांना घरातील दागिने देखील चोरीस गेल्याचे लक्षात आले. चावीची ही चोरी कार्यक्रमादरम्यान झाली असल्याने कोणावर संशय घ्यायचा म्हणून तिने मानपाडा पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार नोंदवली. मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसात अधिकारी अविनाश वनवे यांच्या पथकाने तपास सुरु केला. या संपूर्ण परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासण्यात आले. याच दरम्यान एक महिला संशयितरित्या आढळून आली. पोलिसांनी जेव्हा या महिलेची चप्पल पाहिली तेव्हा ती प्रिया सक्सेना यांची मावस बहीण सिमरन पाटील हिची असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सिमरनला ताब्यात घेत विचारपूस केली असता तिने केलेला गुन्ह्याची कबुली दिली. मानपाडा पोलिसांनी तिच्याकडून चोरी केलेले चाळीस तोळे सोने हप्तगत केले आहे. सिमरनने आधी पर्समधून चावी चोरली. त्यानंतर नवी मुंबई इथून ती खोनी पलावा इथे आली. चावीच्या साहाय्याने प्रिया सक्सेना यांच्या फ्लॅटचा दरवाजा उघडून तिने दागिने चोरी केले. नंतर पर्समध्ये चावी ठेवायला ती कामोठे येथे कार्यक्रमात देखील पोहोचली मात्र तिला चावी ठेवता आली नाही. सिमरन काही दिवसांपूर्वी प्रिया हिच्या घरी राहण्यास आली होती, तेव्हाच तिने या घराची रेकी केली होती.

फेब्रुवारीपासून मानखुर्द-ठाणे प्रवास केवळ पाच मिनिटांत

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : छेडा नगर वाहतूक सुधार प्रकल्पातील मानखुर्द – ठाणे उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून सोमवारी रात्री या उड्डाणपुलातील शेवटचा गर्डर (तुळई) बसविण्यात आला. आता उर्वरित कामे पूर्ण करू हा पूल १५ फेब्रुवारीपासून वाहतूक सेवेत दाखल करण्याची तयारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरू केली आहे. हा पूल सुरू झाल्यास छेडा नगर येथील वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, असा दावा करण्यात येत आहे. त्याचवेळी महत्त्वाचे म्हणजे मानखुर्द – ठाणे अंतर केवळ पाच मिनिटात पार करणे शक्य होणार आहे. पूर्वमुक्त मार्गावरून सुसाट येणाऱ्या वाहनांचा छेडा नगर जंक्शन येथील वाहतूक कोंडीत खोळंबा होता. त्यामुळे एमएमआरडीएने 'छेडा नगर वाहतूक सुधार प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत छेडा नगर येथे तीन उड्डाणपूल आणि एक सब-वे बांधण्यात येत आहेत. यापैकी पहिला तीन मार्गिकेचा पूल ६८० मीटर लांबीचा असून तो शीव आणि ठाण्याला जोडणारा आहे. दुसरा दोन मार्गिकांचा उड्डाणपूल १,२३५ मीटर लांबीचा असून तो मानखुर्द रोडपासून थेट ठाण्याला जोडण्यात येणार आहे. तिसरा ६३८ मीटर लांबीचा छेडा नगर उड्डाणपूल

सांताक्रुझपासून चेंबूर जोडरस्त्याला जोडण्यात येणार आहे. यासाठी २४९.२९ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. यापैकी ६३८ मीटर लांबीचा छेडा नगर उड्डाणपूल मार्च २०२२ मध्ये वाहतुकीस खुला करण्यात आला. सांताक्रूझ ते चेंबूर जोडरस्ता प्रकल्पास हा उड्डाणपूल जोडण्यात आला असून हा पूल खुला झाल्याने छेडा नगर येथील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत होत आहे. छेडा नगर उड्डाणपुलासह ५१८ मीटर लांबीच्या आणि ३७.५ मीटर रुंदीच्या सब-वेचा पहिला टप्पाही पूर्ण झाला असून तो वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. आता मानखुर्द ते ठाणे उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असून या कामातील एक महत्त्वाचा टप्पा सोमवार, १६ जानेवारी रोजी पूर्ण करण्यात आला. या उड्डाणपुलातील शेवटचे दोन गर्डर बसविण्याचे काम शिल्लक होते.

यापैकी एक गर्डर सोमवारी सकाळी, तर दुसरा याच दिवशी रात्री बसविण्यात आला. एकूणच आता काम अंतिम टप्प्यात आल्याने उर्वरित कामे लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.

PUBLIC NOTICE

Mr. Raju Singh Parmar Member of the Goregaon Gaondevi SRA Co-operative Housing Society Ltd., having address at **Flat No. 607**, Building 6, Faldor, 1 B Wing, Off. Link Road, Behind Shastri Nagar, Building **16**, Goregaon (W), Mumbai-400062 and holding **Flat No. 607** in the building of the society. That said Late **Raju Singh Parmar** expired on **18/09/2018.** That after his death his wife **Late Smt. Rambha Bai** became the owner of said flat premises. That Late Smt. Rambha Bai also expired on **14/06/2020.** That after the death of said Smt. **Rambha Bai, Mr. Ghanshyam Singh Parmar** has become the lawful owner of the said flat premises. That their legal heir **Mr. Ghanshyam Singh Parmar** has applied to the society about transfer of the said Shares/ Flat.

The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants objector or objectors to the transfer of the said shares and interest in the deceased member in the capital/ property of the society within a period of **15 days** from the date of publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/ her/ their claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital property of the society. If No claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as provided under the Bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the Bye-laws of the society. A copy of the registered Bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the Society between **11:00 AM to 4:00 P.M.** from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

For and on behalf of
Goregaon Gaondevi SRA CHS LTD.
Sd/-
Honorable Secretary.

Place: Mumbai Date: 17/01/2023

फॉर्म क्र. यूआरसी-२

प्रकरण XXI च्या भाग १ अंतर्गत नोंदणीकरणाकरिता अंदाजे जाहिरात देणारी सूचना (कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ३७४ (बी) अंतर्गत व कंपनी (निबंधकांचे प्राधिकरण) नियम, २०१४ च्या नियम ४(१) अंतर्गत)

१. सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ३६६ च्या उप-अनुच्छेद (२) च्या तरतूदीअंतर्गत शेअर्सद्वारे कंपनी मर्यादित म्हणून कंपनी कायदा २०१३ च्या प्रकरण XXI च्या भाग १ अंतर्गत नोंदणीकृत केलेल्या बैजनाथ मेलाराम, भागीदारी संस्था म्हणून मुंबई येथील रजिस्ट्रार येथे अंतर्गत तीस दिवसांच्या पूर्ततेच्या पूर्वी व पंधरा दिवसांच्या नंतर कंपनी मर्यादित म्हणून यांना अर्ज करण्याचा प्रस्ताव करत आहे.

२. कंपनीचा प्रमुख विषय म्हणून खालीलप्रमाणे :
कंपनी इम्पोर्ट, एक्सपोर्ट व आयरनचे ट्रेडिंग व स्टील तसेच फेरस व नॉन-फेरस मेटल्स, शिप ब्रेकिंग सुविधा व अन्य संबंधित उपक्रम यांचे व्यवसाय नियुक्त करत आहेत.

३. संघटनेच्या मसुद्याची ड्राफ्टची प्रत व प्रस्तावित संघटनेच्या मसुद्याची प्रत प्रस्तावित कंपनी कार्यालय पत्ता युनिट क्र. २०४, सीटीएस क्र. जी/५२ ते जी/५५, गाव बीए, एचडीएफसी बँकजवळ, खिरा नगर, टीपीएस ३, एस व्ही रोड, मुंबई ४०० ०५४ (महाराष्ट्र).

४. सूचना याद्वारे देण्यात येते की, कोणाही व्यक्तीस सदर अर्जासंबंधात कोणतेही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरूपात सेंट्रल कंपनीचे निबंधक (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए), प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर ५, आयएम टी मानेसार, जिल्हा गुडगाव (हरयाणा), पिन कोड १२२ ०५० येथे एकवीस दिवसांच्या आत सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून त्यांच्या नोंदणीकृत कार्यालय येथे प्रत प्राप्त करता येईल.

दि. १३ जानेवारी, २०२३

अर्जदार यांचे नाव
बैजनाथ मेलाराम यांच्याकरिता
१. विनोद अगरवाल, २. भुपेंद्र अगरवाल, ३. नितेश अगरवाल

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

वसई शाखा : जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि., बी/१०१, १ ला मजला, किनी आर्केड, बरमपूर, स्टेला पेट्रोल पम्पजवळ, वसई (प), पालघर ४०१ २०२.
दूर. ८०८००२२३०९/८०८०३२२३०९ ईमेल : vasai@gichf.co.in
कॉर्पोरेट कार्यालय/ मुख्य कार्यालय : जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शोरन्स बिल्डींग, ६ वा मजला, जे. टी. रोड, ॲस्टोरिया हॉटेलच्या पुढे, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.
दूर. ०२२-२२८५ १७६५/६६/६७ ईमेल : Corporate@Gichf.com वेबसाइट : www.gichfindia.com

प्रत्यक्ष ताबा सूचना सरफैसी कायदा, २००२ अंतर्गत नियमांच्या नियम ८ च्या उप-नियम (१) अंतर्गत

ज्याअर्थी अधोहस्ताक्षरित हे जीआयसीएचएफएल यांचे प्राधिकृत अधिकारी म्हणून तुम्हाला/ कर्जदार (खालील निर्देशित) यांना सरफैसी कायदा, २००२ च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत संबंधित सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकित रक्कमेचे प्रदान करण्याकरिता त्यांच्या संबंधित तारखेस मागणी सूचना दि. ०३.०५.२०२१ रोजी जारी करत आहेत. तुम्हाला/कर्जदार यांना सर्वांना विहित वेळेच्या आत सदर थकित रक्कमेचे प्रदान करण्यास कसूर केली आहे, त्यामुळे जीआयसीएचएफएल सरफैसी कायदा, २००२ च्या अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (४) च्या तरतूदी अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये नियम अंतर्गत खालील निर्देशित प्रतिभूत मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतील.

अनु. क्र.	कर्जदार व सह-कर्जदार यांचे नाव / फाईल क्र.	गहाण मालमत्तेचा पत्ता	दि. ३०.१२.२०२२ अनुसार थकित रक्कम	मागणी सूचना	प्रत्यक्ष ताबा तारीख
१.	एमएच०७४०६००००७८७	हितेश धिरजलाल पटेल महालक्ष्मी रेसिडन्सी बिल्डींग क्र. १०, घर क्र. फ्लॅट क्र. ७०४, मजला क्र. : ७ वा, प्लॉट क्र. ४, ४ स्ट्रीट नाव : मोरे रोड, सेक्टर विभाग क्र. : मोरे, जमिन मार्क : नुतन स्कूल ॲन्ड कॉलेज, गाव : मोरे, ठिकाण : नालासोपारा पूर्व, तालूका : वसई, राज्य : महाराष्ट्र, पिन कोड ४०१ २०९.	रु. २९,३३,४३९/-	०३.०५.२०२१	०९.०१.२०२३

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरित हे जीआयसीएचएफएल यांचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि. ०३.०५.२०२१ रोजी मागणी सूचना सरफैसी कायदा, २००२ च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी केली होती व तुम्ही कर्जदार (खालील निर्देशित) यांनी सदर सूचनेमध्ये निर्देशित थकित रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृत तारखेपासून ६० दिवसांच्या आत करावे. तुम्ही/ कर्जदार यांनी यापुढे सदर विहित कालावधीच्या आत सदर थकबाकींचे प्रदान न केल्यास जीआयसीएचएफएल सरफैसी कायदा, २००२ च्या अनुच्छेद १३ च्या उप अनुच्छेद (४) अंतर्गत तरतूद अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जाचे प्रदान करावे व खालील प्रतिभूत मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात येईल.

दि. १७.०१.२०२३
ठिकाण : वसई

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. करिता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

इंडियन बँक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

१-४, नताषा मनोर ए, चांदवरकर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.
दूर. क्र. ०२२-२८९५५८६८/२८९५५८५८ ईमेल : borivali@indianbank.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)
(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत इंडियन बँक यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता अनुच्छेद १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार श्री. परवीन लालमोहम्मद शेख (कर्जदार/ गहाणवटदार) व श्री. लाल मोहम्मद शेख (कर्जदार/ गहाणवटदार) यांना सूचनेमध्ये निर्देशित रक्कमेचे प्रदान **रु. ३३,९२,०२७.००/- (रु. तेहत्तीस लाख ब्याण्णव हजार सत्तावीस मात्र)** या रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याकरिता मागणी सूचना दि. १९.०५.२०२२ रोजी जारी केली होती.

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरित यांनी नियम ८ सहवाचन सदर ॲक्टच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत सहवाचन त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. १३ जानेवारी, २०२३ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे इंडियन बँक यांच्या प्रभारांतर्गत रु. ३३,९२,०२७.०० व त्यावरील व्याज व अन्य प्रभार मागणी सूचनेच्या तारखेपासून रक्कमेच्या अधीन असतील.

कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण :
फ्लॅट क्र. ५०१ व ५०१ए, ५ वा मजला, बिल्डींग क्र. १, गौरव एक्सेलेन्सी मोजमापित २८७ व ४४७ चौ. फूट चटई क्षेत्रफळ अनुक्रमे सर्व्हे क्र. २२५/१/ए, २सी, ८६/२, ३, ४, ८ भाग, ८७/१ए, गाव घोडबंदर, तालूका व जिल्हा ठाणे ४०१ १०७ येथील मालमत्ता.
सीमा : उत्तरेस : यू/सी बिल्डींग, दक्षिणेस : रोड, पूर्वेस : यू/सी बिल्डींग, पश्चिमेस : ६० फूट रोड.

दि. १३.०१.२०२३
ठिकाण : मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
इंडियन बँक

बॉम्बे मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
(स्थापना : १९३९) (मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक)
नोंदणीकृत मुख्य कार्यालय : झेन जी. रंगुनवाला बिल्डींग, ७८, मोहम्मद अली रोड, मुंबई ४०० ००३.
दूर. क्र. : ०२२-२३४२५९६१-६४/०२२-२३११४८०० खाते उर्वरित चौकशी मिस्ड कॉल : ९५१२००४४०६
टोल फ्री क्र. : १८०० २२० ८५४ आयएफएससी कोड: UTIB0SBMCB1

स्थावर मालमत्तेची लिलाव विक्री

जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जेथे कुठे आहे तत्त्वावर खालील मालमत्तेच्या खरेदीकरिता सार्वजनिक/ इच्छुक बोलीदार यांच्याकडून मोहोरबंद प्रस्ताव/ निविदा मागवीत आहेत जी आता सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अनुच्छेद १३(४) अनुसार बॉम्बे मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी यांनी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण	राखीव मूल्य	इसारा रक्कम	मालमत्तेची चाचणी	निविदा/ प्रस्ताव सादरीकरणाची तारीख व वेळ व ठिकाण	निविदा उघडण्याची तारीख व वेळ	प्रतिभूत धनको यांचे नाव व पत्ता	कर्जदार/ गहाणवटदार यांचे नाव	थकित कर्ज रक्कम
एफ१. फ्लॅट धारक क्र. १०३, १ ला मजला, विजय प्राईड, प्लॉट क्र. ३१, सेक्टर क्र. २०, तळोजा. तालूका पनवेल जिल्हा, रायगड ४१० २०८ येथील चटई क्षेत्रफळ ३७३ चौ. फूट व (सी. बी. +एफ.बी. + टीईआर +ईएलई+ एसएस क्षेत्रफळ)	रु. १६,१७,७००/-	रु. १,६१,७७०/-	दि. २४.०१.२०२३ रोजी स. ११.०० ते ४.०० पर्यंत	बॉम्बे मर्कंटाईल को-ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय, ७८, मोह. अली रोड, मुंबई ४०० ००३ येथे दि. ०१.०२.२०२३ रोजी वा पूर्वी प्राधिकृत अधिकारी यांना मोहोरबंद निविदा/ प्रस्ताव सादर करावे.	दि. ०२.०२.२०२३ रोजी ४.०० वा.	बॉम्बे मर्कंटाईल को-ऑप. बँक लि., मुख्य कार्यालय ७८, मोह. अली रोड, मुंबई ४०० ००३.	श्री. विनोद कुमार अंबालाल शाह व श्रीम. हिना विनोद शाह	दि. ३०.०९.२०२२ अनुसार रु. ४१.७८ लाख व पुढील व्याज दि. ०१.१०.२०२२ पासून संपूर्ण प्रदान होईपर्यंत.
२. फ्लॅट धारक क्र. १०४, १ ला मजला, विजय प्राईड, प्लॉट क्र. ३१, सेक्टर क्र. २०, तळोजा. तालूका पनवेल जिल्हा, रायगड ४१० २०८ येथील चटई क्षेत्रफळ ३६४ चौ. फूट व (सी. बी. +एफ.बी. + टीईआर +ईएलई+ एसएस क्षेत्रफळ)	रु. १६,०३,७००/-	रु. १,६०,३७०/-						

१. खरेदीदार यांनी स्टॅम्प ड्युटी, नोंदणीकरण प्रभार, हस्तांतरण प्रभार, किरकोळ खर्च सर्व वैधानिक थकबाकी कर व दर व आउटगोईंग दोन्ही विद्यमान व पुढील मालमत्तेच्या संबंधात सर्व खर्च जमा करावे.
२. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण न देता विक्री पुष्टी वा निविदा उघडण्याची तारीख पुढे ढकलणे व/वा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार राखून आहे.
३. गहाणवटदार/ कर्जदार प्रस्तावित बोलीदार/ प्रस्तावकर्ता यांना सोबत आणावे व दि. ०२.०२.२०२३ रोजी प्रस्ताव उघडण्याच्या वेळी उपस्थित राहावे.
४. बोलीदार/ प्रस्तावकर्ता यांनी मालमत्तेची पडताळणी करावी व तसेच जे इच्छुक असल्यास हक्क करारांची पडताळणी करावी.
५. यशस्वी बोलीदार/ प्रस्तावकर्ता यांनी तात्काळ बोली रक्कमेच्या १०% रक्कम जमा करावी, १५% बोली रक्कम पुढील दिवशी व उर्वरित ७५% रक्कम निविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करावी.
६. यशस्वी बोलीदार यांनी खात्री करावी की, त्यांचे स्वत:चे सोर्सेस विक्री अंतर्गत मालमत्तेच्या संबंधात कोणतेही प्रभार, धारणाधिकार, अडथळे, मालमत्ता कर यांकरिता जबाबदार असतील व यशस्वी बोलीदार यांची सदर स्थावर मालमत्ता यांचे कोणतेही थकबाकी/ अडथळे यांची माहिती प्राप्त करावी.
७. अडथळे जर काही असल्यास यशस्वी खरेदीदार यांच्याद्वारे सर्व सोसायटीच्या वैधानिक थकबाकींचे प्रदान करावे.
८. जर यशस्वी बोलीदारांनी प्रस्ताव उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत बोली-आयडी रक्कमेच्या उर्वरित ७५% रक्कमेचे प्रदान करावे व रक्कम जमा करावी.
९. निविदा जर राखीव मूल्याच्या खालील असल्यास त्यावर विचार केला जाणार नाही.
१०. जर विक्री संबंधात कोणतीही चौकशी असल्यास तुम्ही प्राधिकृत अधिकारी श्री. जाविद पटेल यांना मो. क्र. ९८२१३३४७५३ वर संपर्क साधावा.

सरफैसी ॲक्टच्या नियम ८(६) अंतर्गत वैधानिक सूचना : सदर सूचना कर्जदार/ हमीदार/ गहाणवटदार यांना देण्यात येते की, सरफैसी कायदा, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत वरील कर्ज प्राप्त केले आहे व वरील निर्देशित तारखेस प्रतिभूत मालमत्तेची विक्री करण्याकरिता आम जनतेस मोहोरबंद निविदा मागवीत आहेत व ती सूचना पूर्णत: वैध आहे. सूचना याद्वारे देण्यात येते की, लिलाव विक्रीकरिता तारखेपूर्वी वरील निर्देशित रक्कमेचे प्रदान करावे अन्यथा मालमत्तेची विक्री व उर्वरित थकबाकी जर काही असल्यास तुमच्याकडून व्याज व मूल्यासह वसुल करण्यात येईल.

दि. १७.०१.२०२३
ठिकाण : मुंबई

सही/-
जाविद पटेल
प्राधिकृत अधिकारी
बॉम्बे मर्कंटाईल को-ऑप. बँक लि.

आरकेडी आग्री ॲन्ड रिटेल लिमिटेड
(सीआयएन : L15400MH1986PLC316001)
नोंदणीकृत कार्यालय : बी-१०२, सरस्वती अपार्टमेंट, राधाकृष्णा मार्ग, मोग्रा गाव, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९.
दूर. : ०२२-२६८७५१८० ई-मेल : himalchulifoodproducts@gmail.com वेबसाइट : www.hfpld.in

अति सर्वसाधारण सामान्य सभेच्या सूचनेचे सुधारपत्रक

आरकेडी आग्री ॲन्ड रिटेल लिमिटेड (कंपनी) यांनी बुधवार, दि. २५ जानेवारी, २०२३ रोजी ३.०० वा. कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालय येथे वरील निर्देशित पत्त्यावर आयोजित अतिविशेष सर्वसाधारण सभेकरिता दि. २३ डिसेंबर, २०२२ (ईओजीएम सूचना) जारी केली होती. सदर सूचना सर्व भागधारक यांना प्रसारित केली आहे, कंपनी कायदा, २०१३ च्या तरतूदी अनुपालन संबंधित नियम अनुसार जारी केली आहे.

सर्व भागधारकांना अति विशेष सामान्य सभा (ईओजीएम सूचना) पाठवणी पूर्ण केली आहे, आम्ही खालील पृष्ठ अनुसार बाब क्र. १ व २ मध्ये पूर्ण केलेल्या उप-खंड क्र. ४ खंड बी : मूल्यावर आधारित कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०२ च्या तरतूदी अंतर्गत अतिविशेष अहवाल अनुसार ईओजीएम सूचना दि. २३ डिसेंबर, २०२२ रोजी परिशिष्ट अनुसार सूचित केली होती. अंतिम पृष्ठानंतर अतिरिक्त नवीन पृष्ठ उप **खंड क्र. ४ खंड बी मध्ये अतिविशेष अहवाल बाब क्र. १ व २** करिता पुढीलप्रमाणे वाचावा :

एफसीए पायल गडा, चार्टर्ड अकाऊंटंट (आयसीएआय सभासदत्व क्र. ११०४२४) यांच्याकडून प्राप्त मूल्यांकन अहवाल वैयक्तिक नोंदणीकृत मूल्यांकन यांच्या क्षमता अनुसार (आयबीबीआय/आरव्ही/०६/२०१९/१११७०) अनुसार कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या स्पष्ट मूल्यांकनावर विनियमन १६५, विनियमन १६६ए व कोणतेही अन्य लागू विनियमन, जर काही असल्यास सेबी आयसीडीआर विनियमनाच्या प्रकरण ५ च्या भाग ४ अंतर्गत प्रस्तावित विहित जारी करण्याकरिता कंपनीच्या वेबसाइट वर टॅब इन्वेस्टर रिलेशन अंतर्गत http://www.hfpltd.in